तरुण भारत संवाद
शुक्रवार, १२ डिसेंबर २०२५




# विवेकानंद कॉलेजची पन्हाळा पावनखिंड मोहीम

प्रतिनिधी
कोल्हापूर

मराठा साम्राज्याच्या इतिहासातील सर्वात महत्वाच्या घटनांची आठवण करून देणारी मोहीम व इतिहासाची साक्ष घालत पन्हाळा ते पावनखिंड परिसरातील ही आव्हानात्मक आणि प्रेरणादायी पदभ्रमंती विवेकानंद कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी व एन. सी.सी. छात्रानी यशस्वीरित्या पूर्ण केली. यावेळी शिवकाळातील पराक्रमाची साक्ष देणाऱ्या वीर शिवराय आणि बाजीप्रभू देशपांडे यांच्या शौर्याची आठवण ताजी केली.

या पदभ्रमंतीची सुरुवात पहाटे पन्हाळा किल्ल्यावरून झाली. जंगलातील वाटा, चढ–उतारांनी भरलेल्या डोंगर रांगा, तसेच अवघड मार्ग पार करत विद्यार्थ्यांनी व एन. सी.सी. छात्रानी अत्यंत शिस्तबद्ध प्रवास केला. पावनखिंड येथे पोहोचताच सर्वांनी बाजीप्रभू देशपांडे व बांदल मावळे यांच्या बलिदानास अभिवादन केले.

या पदभ्रमंती मोहिमेचे आयोजन एन.सी. सी. मुली विभागाच्या एन.सी.सी. मेजर सुनिता भोसले व आय. क्यू. ए. सी. प्रमुख डॉ. श्रुती जोशी यांचे मार्फत करण्यात आले होते. या मोहिमेस सह्याद्री प्रतिष्ठानच्या सदस्यांचे मार्गदर्शन लाभले. सह्याद्री प्रतिष्ठानचे मार्गदर्शक युवराज संभाजीराजे छत्रपती व अध्यक्ष हेमंत साळोखे, सदस्य शुभम कोळी, प्रविण केंबळे, योगेश वेटोळे, पार्थ जाधव, केतन कांबळे, राजवर्धन आडनाईक, अखिलेश गुरव यांचे सहकार्य लाभले. या पदभ्रमंतीच्या आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस. पी थोरात, ६ महाराष्ट्र गर्ल्स बटालियनचे कमांडींग ऑफिसर कर्नल विक्रम नलवडे, एस.के. धनवडे यांचे प्रोत्साहन लाभले.

पुण्य नगरी
शुक्रवार, १२ डिसेंबर २०२५ | कोल्हापूर

# विवेकानंद कॉलेज हे शिक्षणासह कलेचे संस्कार केंद्र

## अभिनेते आनंद काळे; ज्युनिअर सायन्स एज्युकेशन फेअरचा उद्‍घाटन सोहळा

कोल्हापूर : प्रतिनिधी

विवेकानंद कॉलेज हे शिक्षणाबरोबरच कला व क्रीडा क्षेत्रांचे संस्कार केंद्र आहे. महाविद्यालयामध्ये नृत्य, गायन, वादन, अभिनय या सुप्त गुणांना वाव देणारे कार्यक्रम आयोजित केल्यामुळेच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो, असे प्रतिपादन अभिनेते आनंद काळे यांनी केले. येथील स्वामी विवेकानंद कॉलेजमध्ये ज्युनिअर सायन्स एज्युकेशन फेअरच्या उद्‍घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी थोरात होते.



कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमधील कार्यक्रमात बोलताना अभिनेते आनंद काळे. सोबत इतर मान्यवर.

या फेअरमध्ये इयत्ता अकरावी, बारावी सायन्स या वर्गांतील विविध कलाप्रकार तसेच पोस्टर प्रदर्शन, टाकाऊपासून टिकाऊ, फूड स्टॉल इत्यादीमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला. दीपप्रज्वलन आणि शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे रचित संस्था प्रार्थनेने प्रारंभ झाला. स्वागत व प्रास्ताविक ज्युनि. सायन्स विभागप्रमुख प्रा एम. आर. नवले यांनी केले. पाहुण्यांचा परिचय सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. गीतांजली साळुंखे यांनी करून दिला. आभार प्रा. एस. टी. शिंदे यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. ए. पी. साळोखे, प्रा. ए. पी. म्हात्रे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सांस्कृतिक विभागातील प्रा. एन. एन. हिटणीकर, प्रा. एस. एस. जगताप, प्रा. एल. एस. नाकाडी, प्रा. एस. ए. माने, प्रा. आर. एन. पाटील, प्रा. आर. व्ही. घाटगे, रजिस्ट्रार एस. के. धनवडे आदींचे सहकार्य लाभले.

पुण्य नगरी
शुक्रवार, १२ डिसेंबर २०२५ । कोल्हापूर

# 'विवेकानंद'तर्फे पन्हाळा-पावनखिंड मोहीम

**कोल्हापूर :** मराठा साम्राज्याच्या इतिहासाची आठवण करून देणारी आणि राज्यभर प्रसिद्ध असलेली पन्हाळा ते पावनखिंड ही आव्हानात्मक मोहीम विवेकानंद कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी व एनसीसी छात्रांनी यशस्वीरीत्या पूर्ण केली. या पदभ्रमंतीची सुरुवात पहाटे पन्हाळा किल्ल्यावरून झाली. जंगलातील वाटा, चढ-उतारांनी भरलेली डोंगररांग, अवघड मार्ग पार करत विद्यार्थ्यांनी व एनसीसी छात्रांनी अत्यंत शिस्तबद्ध प्रवास केला. पावनखिंड येथे पोहोचताच सर्वांनी बाजीप्रभू देशपांडे व बांदल मावळे यांच्या बलिदानास अभिवादन केले. सर्वांनी त्यांच्या शौर्यगाथेला वंदन करत एक मिनिट मौन पाळले. या मोहिमेचे आयोजन एनसीसी मुली विभागाच्या मेजर सुनीता भोसले, आयक्यूएसीप्रमुख डॉ. श्रुती जोशी यांनी केले. ही मोहीम सह्याद्री प्रतिष्ठानच्या सदस्यांच्या मार्गदर्शनाने झाली. प्रतिष्ठानचे मार्गदर्शक संभाजी छत्रपती महाराज, अध्यक्ष हेमंत साळोखे, सदस्य शुभम कोळी, प्रवीण केंबळे, योगेश वेटोळे, पार्थ जाधव, केतन कांबळे, राजवर्धन आडनाईक, अखिलेश गुरव यांचे सहकार्य लाभले. प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, ६ महाराष्ट्र गर्ल्स बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल विक्रम नलवडे, प्रबंधक एस. के. धनवडे यांचे प्रोत्साहन लाभले.